# ज्वारीला किडे लागू नये म्हणून एक्सपायर किटकनाशक औषधाची फवारणी


**बीड । दिव्य रिपोर्टर**

अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यासाठी गव्हाऐवजी पणन हंगाम २०२५-२६ रब्बी हंगामात जिल्हा मार्केटींग अधिकारी, बीड यांनी दि.२२ जून २०२६ ते ३० जून २०२६ अखेर पर्यंत जिल्ह्यातील रेशनधारकांना वाटप करण्यासाठी ११९५८.३७ मेगाटन ज्वारी खरेदी करण्यात आली. त्या अनुषंगाने आता ऑक्टोबर महिन्यात ग्राहकांना ज्वारीचे वितरण होणार असून यासाठी जिल्हाभरातील गोदामात ज्वारी ठेवण्यात आलेली आहे. बीड तालुक्यासाठी येथील नवा मोंढा परिसरातील गोदामात तर चौसाळ्यातील गोदामात ज्वारीचे साठवण करण्यात आले आहे.

**जून महिन्यात खरेदी केलेल्या ज्वारीचे ऑक्टोबर महिन्यात ग्राहकांना वाटप परंतु सप्टेंबर महिन्यातच ज्वारीच्या पोत्यावर किडे फिरू लागले**

**गोदामाला व्हेंटिलेशन नसल्याने ज्वारीची क्वॉलिटी खराब होण्याची शक्यता**

यापूर्वी रेशन दुकानावर ग्राहकांना किडे व फुपाटायुक्त ज्वारी वाटप करण्यात आली होती. यातून ग्राहकांनी मोठा संताप व्यक्त केला होता, प्रशासनालाही ग्राहकांनी धारेवर धरले होते. पान २ वर





## त्या कंत्राटदाराला ब्लॅकलिस्ट करून कंत्राट रद्द करण्याची गरज

ज्या गोदामात ज्वारी ठेवण्यात आलेली आहे. त्या गोदामाला व्हेंटिलेशन नाही म्हणून ज्वारीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच संबंधित कंत्राटदार एक्सपायर किटकनाशक फवारणी करत असल्याने ज्वारीच्या पोत्यावर जिवंत किडे फिरताना दिसून आले.किटकनाशक एक्सपायर असल्याने याचा किड्यावर परिणाम झाला नाही. दुसरे महत्त्वाचे म्हणजे ऑक्टोबर महिन्यापर्यंत या ज्वारीची क्वॉलिटी घसरण्याची शक्यता असून याला जबाबदार कोण? हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत असून जर प्रमाणित किटकनाशकाची फवारणी झाली असती तर जिवंत किडे सप्टेंबर महिन्यातच पोत्यावर फिरत असलेले दिसून आले नसते. यासाठी आता प्रशासनाने संबंधित कंत्राटदाराला जबाबदार धरून त्या कंत्राटदाराला ब्लॅकलिस्ट करून दिलेले कंत्राट रद्द करण्याची गरज आहे. जोपर्यंत प्रशासन गंभीर कारवाई करणार नाही, दिव्य आधारचा पाठपुरावा सुरू राहील यात काही शंका नाही.


DIVYA AADHAR

https://epaper.divyaaadhar.com

सत्यमेव जयते

साप्ताहिक

# दिव्य आधार

rizwanshaikhekmat33@gmail.com

संपादक : शेख रिजवान मो. 9561840184

बीड वर्ष १४ वे, अंक ०२ , सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ RNI/MAHMAR/2013/54433 पाने-४ किंमत १ रुपया




**ग्राऊंड रिपोर्टींग** पान ४ वर

# एकाच कुटुंबातील पाच जण आगीत होरपळले

**शहरातील शाहूनगर परिसरातील घटना, जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू**

**स्वच्छता सभापती शेख निजाम यांची पिडित कुटुंबीयांना भेट**

**योग्य उपचारासाठी डॉक्टरांकडे शेख निजाम यांचा पाठपुरावा**



**बीड । दिव्य रिपोर्टर**

तब्बल पंधरा दिवसांपूर्वी शाहूनगर परिसरात एका बागवान कुटुंबीयांच्या घरी पहाटेच्या सुमारास आग लागल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेत बागवान कुटुंबीयांतील पाच जण होरपळले. या आगीच्या घटनेनंतर सर्व जखमींना जिल्हा रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले असून सुदैवाने जिवितहानी झाली नसली तरी यातील दोघांची प्रकृती गंभीर असून या घटनेची माहिती मिळाल्यानंतर न.प.चे स्वच्छता सभापती शेख निजाम यांनी पिडित कुटुंबीयांची भेट घेवून संबंधित उपचार करणाऱ्या डॉक्टरांकडे पिडित कुटुंबीयांना योग्य उपाचर मिळावे म्हणून पाठपुरावा केला असून पुढेही काही मदत लागली तर पिडित कुटुंबीयांना मदत करू असे आश्वासन दिले. यावेळी राष्ट्रवादीचे पान २ वर

### गरजूंना मदतीसाठी सदैव तत्पर

तब्बल दहा दिवसांपासून पिडित कुटुंबीय जिल्हा रुग्णालयात उपचार घेत होते. त्यांच्या मदतीला कोणीच आले नाही परंतु ज्यावेळी न.प.चे स्वच्छता सभापती शेख निजाम यांना ही बाब समजली त्यांनी तात्काळ विलंब न करता सर्व काही कामे बाजूला ठेवून पिडित कुटुंबीयांची भेट घेतली. त्यावेळी पिडित कुटुंबीयांतील एका महिलेने निजामभाई यांना ओळखून आम्हाला आतापर्यंत पाहाण्यासाठी कोणीच आले नाही अशी खंत व्यक्त करून ढसाढसा त्या महिलेला रडू कोसळले. त्यावेळी निजामभाईही भावनिक झाले होते. त्यांनी त्या महिलेला उपचाराकामी डॉक्टरांकडे पाठपुरावा तर केलाच त्याशिवाय काही मदत लागील तर सांगा म्हणून आग्रही केला. दुसरे महत्त्वाचे म्हणजे जिल्हा रुग्णालयात काही अडचण असेल गरजूंना मदत लागत असेल तर आमच्यापर्यंत अशा गरजूंना पोहोचवा असे आवाहनही शेख निजाम यांनी केले.

# घरगुती गॅसच्या काळा बाजाराचा मोठा स्कॅम

**ग्राहकांच्या मोबाईलवर आलेला ओटीपी ग्राहकांनी शेअर नाही केला तरी सिलेंडरची डिलेव्हरी व ग्राहकांच्या मोबाईलवर सिलेंडर डिलेव्हरी झाल्याचा फक्त मेसेज**

**काही ग्राहकांची गॅस पुस्तिका काही एजन्सीधारक स्वत:कडे ठेवून घेतात आणि ग्राहकांना अंधारात ठेवून त्यांच्या हक्काचे गॅस सिलेंडर काळ्या बाजारात**

**पुरवठा विभागाने पारदर्शक चौकशी करण्याची गरज**

**बीड । दिव्य रिपोर्टर**

हमखास चहाचे गाळे, रेस्टॉरंट, हॉटेल, ढाबे व बिअरबारचे किचन याठिकाणी सर्रास घरगुती गॅसचा वापर होत असल्याचे सर्वांनीच उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे. ज्यावेळी एखादी तक्रार होते त्यावेळी पुरवठा विभागाला जाग येते आणि कुठेतरी थातूरमातूर कारवाई करून पुरवठा विभाग एक-दोन हॉटेल चालकांवर घरगुती गॅस वापरल्याचा गुन्हा दाखल करून दंड वसूल करतात. परंतु घरगुती गॅस काळ्या बाजारात कसा जातो? घरगुती गॅस सिलेंडरचा काळा बाजार कसा होतो? याचा पाठपुरावा मात्र कोणी करत नाही. त्यामुळेच घरगुती गॅसचा काळ्या बाजारात सर्रास विक्री होत असून यात मोठा स्कॅम उघडकीस येण्याची शक्यता दर्शवली जात आहे. फक्त पुरवठा विभागाने पारदर्शक चौकशी करणे गरजेचे वाटते.

एखादे छोटे कुटुंब असल्याने त्यांना दर महिन्याला सिलेंडरची गरज नसल्याने ते दोन-तीन महिन्याला एखादे पान २ वर

### म्हणूनच एजन्सींवर गुन्हे दाखल होत नाही

**छोट्या कुटुंबीयातील ग्राहकांनी आपल्या गॅस पुस्तिका एजन्सीवर ठेवू नये**

काही दिवसांपूर्वी बीड तहसील पुरवठा विभागाने काही हॉटेलवर धाडी टाकून घरगुती गॅसच्या टाक्या पकडल्या परंतु त्यावेळी फक्त हॉटेल चालकांवरच गुन्हे दाखल झाले. ज्या कंपनीच्या टाक्या हॉटेलवर टाकलेल्या धाडीत पकडण्यात आल्या त्या कंपनीच्या एजन्सीवर कारवाई का झाली नाही? याचे उत्तरच यातून मिळाले असून काही एजन्सीधारक ज्या कुटुंबीयांना महिन्याला गॅस टाकी लागत नाही त्या कुटुंबीयांच्या नावावर दर महिन्याला गॅस टाक्या उचलून त्या टाक्यांचा काळा बाजार केला जातो. जर धाडीत गॅस टाक्या पकडल्या गेल्या तर एजन्सी आपले हात झटकून आम्ही या नंबरची टाकी या महिन्यात अशा अशा ग्राहकांना दिली होती याची नोंद दाखवून स्वत:ची बाजू मजबूत करून घेतात म्हणून आता छोट्या कुटुंबीयांतील ग्राहकांनी आपल्या गॅस पुस्तिका एजन्सीवरून आणून स्वत: दर महिन्याला गॅस टाकी घ्यावी, जेणेकरून घरगुती गॅसचा काळा बाजार होणार नाही.

# तुकडेबंदी प्रमाणपत्रावरील बनावट स्वाक्षरीची चौकशी करून त्या दोन्ही जमिनीची रजिस्ट्री रद्द करण्याची गरज

**एसडीएम दिपक वांजळे यांच्याकडे सर्व स्वाक्षरीचे पुरावे सादर, आता कारवाईकडे लक्ष**

**जर या प्रकरणी प्रशासनाने लक्ष दिले नाही तर महसूलमंत्री यांच्याकडे तक्रार दाखल करणार**

**बीड । दिव्य रिपोर्टर**

केज सहदुय्यम निबंधक कार्यालयात दोन जमिनीची रजिस्ट्री करण्यात आली. या दोन्ही जमिनीची रजिस्ट्री तुकडेबंदी प्रमाणपत्राच्या आधारावर करण्यात आल्याचे समजल्यानंतर दिव्य आधारच्या प्रतिनिधीने या दोन्ही जमिनीच्या रजिस्ट्रीची प्रत काढून पाठपुरावा केला असता ज्या तुकडेबंदी प्रमाणपत्राच्या आधारावर केज दुय्यम निबंधक कार्यालयाने रजिस्ट्री केली त्या तुकडेबंदी प्रमाणपत्रावरील तत्कालीन तहसीलदार स्व.राजेश गिड्डे यांची स्वाक्षरी बनावट असल्याचा संशय आल्याने या प्रकरणाला दिव्य आधारने वाचा फोडली. परंतु प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे का दुर्लक्ष करत आहे? हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत असून आता या पान २ वर

### त्या तुकडेबंदी प्रमाणपत्रावर एप्रिल महिन्याचे दिनांक

विशेष म्हणजे ज्या तुकडेबंदी प्रमाणपत्राच्या आधारावर केज सहदुय्यम निबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दोन जमिनीची रजिस्ट्री केली त्या तुकडेबंदी प्रमाणपत्रावर आवक-जावक क्रमांक नाही. दुसरे महत्त्वाचे म्हणजे ते तुकडेबंदी प्रमाणपत्र एप्रिल २०२५ या महिन्यात देण्यात आलेले दिसून येते. तर मग तब्बल एक वर्षानंतर त्या तुकडेबंदी प्रमाणपत्राच्या आधारावर रजिस्ट्री का करण्यात आली? हा सर्व प्रकार संशयास्पद असून प्रशासनाने याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करून कारवाई करणे अपेक्षित असताना प्रशासन या गंभीर प्रकरणाला पाठिशी का घालत आहे? हे मात्र समजून येत नाही. जर या प्रकरणी प्रशासनाने कारवाई केली नाही तर महसूलमंत्री यांच्याकडे दाद मागण्यात येईल.






# त्या अर्धवट तयार केलेल्या मॉलिक्यूलर लॅबची माहिती डिप्टी डायरेक्टर लातूर यांना दिली

**आता डिप्टी डायरेक्टर याप्रकरणी आढावा घेणार का? याकडे विशेष लक्ष**

**बंद पडलेल्या आयसीयू कक्षाच्या साहित्याचाही डिप्टी डायरेक्टर यांनी आढावा घेण्याची गरज**

**बीड । दिव्य रिपोर्टर**

जिल्हा रुग्णालय परिसरातील शल्यचिकित्सक यांच्या कार्यालयासमोरील भव्यदिव्य इमारतीत यापूर्वी दोन मजले असे सुसज्ज आयसीयू कक्ष सुरू होते परंतु काही एक कारण नसताना ते सुसज्ज आयसीयू कक्ष बंद करण्यात आले तर त्याच इमारतीत डीपीडीसीमधून मिळालेल्या तीन कोटी रुपयाच्या निधीतून मॉलिक्यूलर लॅब तयार करण्याचे नियोजन केले परंतु कमी निधीअभावी मॉलिक्यूलर लॅबही अर्ध्यावरच थांबली. यापूर्वी आयसीयू कक्षासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात आला होता. ते आयसीयू कक्ष बंद झाले तर त्या बंद झालेल्या आयसीयू कक्षाचे साहित्य गेले कुठे? तसेच तीन कोटी रुपये खर्च करून तयार केलेल्या अर्धवट मॉलिक्यूलर लॅबची सद्यपरिस्थिती काय? याचा दिव्य आधार पाठपुरावा करत असताना रुग्णालय प्रशासनाकडून प्रतिसाद मिळत नसल्याने या सर्व बाबींची माहिती डिप्टी डायरेक्टर लातूर यांना देण्यात आली असून आता डिप्टी डायरेक्टर पुढे काय कारवाई करतील याकडे दिव्य आधार लक्ष ठेवणार आहे.

कोणतेही कारण नसताना त्या इमारतीतील आयसीयू कक्ष बंद करून अंतररुग्ण विभागात नवीन आयसीयू कक्ष तयार करण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार सार्वजनिक बांधकाम विभागातून आयसीयू कक्षासाठी निधी उपलब्ध होता. त्या निधीची विल्हेवाट लावण्यासाठी सुरू असलेले आयसीयू कक्ष बंद करून आंतररुग्ण विभागात नवीन आयसीयू कक्ष तयार करण्यात आल्याची जोरदार चर्चा असून यातील सत्य काय? याची पडताळणी करणे हे रुग्णालय प्रशासनाची जबाबदारी आहे. तसेच ज्या इमारतीतील आयसीयू कक्ष बंद झाले त्या इमारतीत मॉलिक्यूलर लॅब तयार करण्याचे काम प्रगतीपथावर होते. या कामासाठी डीपीडीसीमधून तीन कोटी रुपये निधीही मिळाला होता परंतु अपुऱ्या निधीमुळे ती मॉलिक्यूलर लॅब अर्धवट तयार झाली. अर्धवट तयार झाली म्हणजे काय? याचाही डिप्टी डायरेक्टर यांनी आढावा घेण्याची गरज असून संबंधित गुत्तेदाराने तीन कोटी रुपयामध्ये नेमके लॅबचे काय काय तयार केले? याचाही आढावा घेणे गरजेचे वाटते. यासाठी दिव्य आधारने डिप्टी डायरेक्टर यांच्या मोबाईलवरून मेसेज पाठवून सर्व माहिती दिली असून बातमी लिहिपर्यंत डिप्टी डायरेक्टर यांनी मेसेज पाहिला नव्हता. मेसेज पाहिल्यानंतर डिप्टी डायरेक्टर पुढे काय कारवाई करतील याचा पाठुपरावा दिव्य आधार करणार यात काही शंका नाही.

### जिल्हाधिकारी यांनी डिपीडीसीच्या निधीचा आढावा घ्यावा

सुसज्ज आयसीयू कक्ष बंद करून त्या इमारतीत मॉलिक्यूलर लॅब उभे करण्याचे नियोजन करण्यात आले. यासाठी डीपीडीसीमधून तीन कोटी रुपयांचा निधीही मिळाला. तीन कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाल्यानंतर मॉलिक्यूलर लॅबचे काम एका एजन्सीला देण्यात आले. त्यानंतर तीन कोटीचा निधी अपुरा असल्याने लॅबचे काम अर्ध्यावर थांबले. अर्ध्यावर थांबले म्हणजे तीन कोटी रुपयांत संबंधित एजन्सीने काय काय काम केले? याचा जिल्हाधिकारी यांनी आढावा घेण्याची गरज असून याकडे लक्ष देणे गरजेचे वाटते.

# नागापूर खुर्द इनामी जमिनीतून जाणारा पाणंद रस्ता फक्त बेकायदेशीर नव्हे तर त्या रस्त्याचे कामही बोगस

**खडीऐवजी रस्त्याच्या कामाला मोठमोठ्या दगडांचा वापर; मातीमिश्रीत मुरूमाचा रस्त्यावर थर, अधिकारी टक्केवारीत अडकल्याचा संशय**

**बीड । दिव्य रिपोर्टर**

एमआरईजीएस व जी-राम-जी विकसित भारत योजनेअंतर्गत विविध ठिकाणी पाणंद रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. याच योजनेतून नागापूर खुर्द याठिकाणी तीन किलोमीटर पाणंद रस्त्याचे काम सुरू असून सदरील पाणंद रस्त्याचे काम एका एजन्सीला देण्यात आले आहे. सदरील काम सुरू असताना सदरील रस्ता इनामी जमिनीतून होत असल्याचा आरोप करत सदरील काम तात्काळ थांबविण्यात यावे अशी मागणी जिल्हा वक्फबोर्ड अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर वक्फबोर्ड अधिकारी यांनी गटविकास अधिकारी यांना पत्रव्यवहार करून इनामी जमिनीतून होणारे रस्त्याचे काम तात्काळ थांबविण्यासाठी कळविले असून दिव्य आधारच्या प्रतिनिधीने बेकायदेशीर होणाऱ्या रस्त्याची पाहणी केली असता सदरील काम बेकायदेशीर तर आहेतच त्याशिवाय सदरील पाणंद रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे बोगस काम होत असल्याचे दिसून आले आहे. याप्रकरणी गटविकास अधिकारी यांनी विशेष लक्ष देण्याची गरज असून सदरील रस्त्याचे काम बोगस होत असताना संबंधित जबाबदार अधिकारी यांनी या बोगस कामाकडे का दुर्लक्ष केले? यात टक्केवारीचा घोळ असल्याचेही यातून दिसून येत आहे.

नागापूर खुर्द येथे सुरू असलेल्या ३ कि.मी.पाणंद रस्त्याच्या कामाला एमआरईजीएस व विकसित भारत जी-राम-जी योजनेतून मुबलक निधी उपलब्ध आहे. यात तीन कि.मी.रस्त्याचे खडीकरण व नंतर मुरूम अशाप्रकारे हा रस्ता होणार आहे. दिव्य आधारच्या प्रतिनिधीने सुरू असलेल्या रस्त्याची पाहणी केली असता खडीऐवजी मोठमोठे दगड टाकून रस्ता तयार केल्याचे दिसून आले. त्याशिवाय त्या दगडावर मातीचा थर टाकल्याचे दिसून आले. जर अशात पाऊस झाला तर सर्व माती वाहून जाणार, विशेष म्हणजे दगडावर माती असल्याने त्या रस्त्यावरून वाहने घसरून पडण्याचीही शक्यता नाकारता येणार नाही. एकंदरीत एवढा मोठा निधी असताना संबंधित गुत्तेदाराने खडी वापरण्याऐवजी दगड वापरले, मुरूम ऐवजी माती टाकली तर ही बाब पंचायत समितीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शणास का आली नाही? याचीही उच्चस्तरीय चौकशी होणे गरजेचे असून दुसरे महत्त्वाचे म्हणजे सदरील रस्ता हा इनामी जमिनीतून होत आहे अशी तक्रार संबंधित तक्रारदाराने एप्रिल महिन्यात दिली होती. परंतु या तक्रारीची दखल संबंधित वक्फबोर्ड अधिकारी पान २ वर

**तक्रारदाराने एप्रिल महिन्यात त्या रस्त्याची तक्रार दिली होती तर वक्फबोर्ड अधिकारी यांनी त्याचवेळी दखल का घेतली नाही? उच्चस्तरीय चौकशीची गरज**

**संबंधित अभियंता यांनी नकाशानुसार रस्ता का केला नाही? जर इनामी जमिनीतून रस्ता करायचा होता तर वक्फबोर्ड कार्यालयातून नाहरकत का घेतले नाही? रस्त्याचे काम बोगस होत असताना अधिकाऱ्यांनी का दुर्लक्ष केले? संबंधित गुत्तेदारावर कारवाई करण्याची गरज**





### बोगस कामाचीही चौकशी करा

नियमाने पाणंद रस्ता तयार करण्यासाठी कोणत्या साईझची खडी वापरण्यात यावी, तसेच रस्ता करण्यापूर्वी त्या जागेवर खोदकाम किती करण्यात यावे? खडीकरण झाल्यानंतर दबाई करून मुरूमाचे थर किती जाडी टाकणे गरजेचे आहे. त्यानंतर पुन्हा दबाई करणे अपेक्षित आहे. परंतु सध्या ज्याठिकाणी हा रस्ता झाला त्याठिकाणी संबंधितांनी खडीऐवजी मोठमोठ्या दगडांचा वापर केला. तसेच मुरूम ऐवजी माती टाकल्याचे दिसून आले. त्याशिवाय मोठमोठे दगड टाकून दबाई केल्याचेही दिसून आले नाही. या सर्व बाबींची चौकशी करणे गरजेचे असून जोपर्यंत इनामी जमिनीतून जाणाऱ्या रस्त्याचा विषय व बोगस झालेल्या कामाविषयी चौकशी होत नाही तोपर्यंत मजूरांचे मस्टर काढू नये अशी सर्वसामान्यातून मागणी होत आहे.

# दिव्य आधारचे संपादक शेख रिजवान यांच्यावर शब्दसुमनाने शुभेच्छांचा वर्षाव

## ग्रामीण भागातील विविध घडामोडींना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य दिव्य आधारने केले

दिव्य आधार दैनिकाने पत्रकारितेच्या क्षेत्रात गेल्या १४ वर्षांमध्ये अत्यंत उल्लेखनीय आणि विश्वासार्ह वाटचाल केली आहे. समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या, सामाजिक प्रश्न, शैक्षणिक व प्रशासकीय विषय तसेच ग्रामीण भागातील विविध घडामोडींना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य दिव्य आधारने सातत्याने केले आहे.



पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्याची जबाबदारी नसून समाजातील वास्तव परिस्थिती लोकांसमोर मांडण्याचे आणि अन्यायाविरोधात आवाज उठविण्याचे प्रभावी माध्यम आहे. ही सामाजिक बांधिलकी जपत दिव्य आधारने आपल्या निर्भीड आणि लोकाभिमुख पत्रकारितेतून वाचकांच्या मनात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. दि. ३ सप्टेंबर रोजी दिव्य आधार आपल्या १४ व्या वर्धापन दिनात पदार्पण करीत आहे, ही संपूर्ण दिव्य आधार परिवारासाठी अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे. या १४ वर्षांच्या प्रवासामागे संपादक, पत्रकार, प्रतिनिधी, जाहिरातदार, हितचिंतक आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे दिव्य आधारवर विश्वास ठेवणाऱ्या असंख्य वाचकांचे योगदान आहे. या निमित्ताने संपादक मा. शेख रिजवान साहेब आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक अभिनंदन. आगामी काळातही दिव्य आधारने सत्य, निर्भीडता, निष्पक्षता आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवून पत्रकारितेची ही उज्ज्वल परंपरा अधिक सक्षमपणे पुढे न्यावी, अशी मनःपूर्वक अपेक्षा आहे. दिव्य आधारच्या माध्यमातून समाजातील वंचित, दुर्लक्षित आणि सर्वसामान्य घटकांच्या प्रश्नांना सातत्याने न्याय मिळत राहो. दिव्य आधारचा वाचकवर्ग दिवसेंदिवस वाढत जावो, दैनिकाची लोकप्रियता महाराष्ट्रभर विस्तारत जावो आणि येणारी अनेक वर्षे यश, विश्वास व समाजसेवेची अशीच गौरवशाली वाटचाल सुरू राहो, हीच सदिच्छा. दिव्य आधार दैनिकाच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त संपादक, पत्रकार, प्रतिनिधी आणि संपूर्ण दिव्य आधार परिवारास हार्दिक अभिनंदन व मनःपूर्वक शुभेच्छा!

**काझी मुशाहेद अजिज, जिल्हाध्यक्ष, अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटना, बीड**



दिव्य आधार हे साप्ताहिक अत्यंत परखड, मुद्देसूद प्रत्येक बातमीमध्ये अत्यंत बारीकसारिक व ठळक प्रकाश टाकणाऱ्या बातम्या प्रकाशित केल्या जातात व विषयात मुद्देसूदपने हात घालण्याची प्रचंड मोठी क्षमता संपादक श्री. रिजवान शेख सरामध्ये आहे व या साप्ताहिकमध्ये आहे या वर्धापन दिनी या साप्ताहिकचा वटवृक्ष वाढत जावो ही सदिच्छा व सर्वांना वर्धापन दिनाच्या खूप खूप शुभेच्छा!!!

**पांडुरंग भिमराव गर्जे**
राज्यकर निरीक्षक, वस्तू व सेवा कर कार्यालय, बीड

गेल्या अनेक वर्षांपासून रिझवान भाईंची पत्रकारिता जवळून पाहत आलो आहे. केवळ कार्यालयात बसून बातम्या करण्यापेक्षा प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन, परिस्थिती समजून घेत सर्वसामान्यांचे प्रश्न मांडणाऱ्या पत्रकारांपैकी एक म्हणून मी त्यांच्याकडे पाहतो.



विशेषतः गोरगरीब, वंचित आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना आपल्या लेखणीतून तळमळीने वाचा फोडत, त्यांच्या न्यायासाठी भूमिका घेण्याचे काम रिझवान भाई सातत्याने करत आले आहेत. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील प्रश्नांना आवाज देत त्यांचा हा प्रवास निश्चितच कौतुकास्पद आहे.

'दिव्य आधार'च्या १४ व्या वर्धापनदिनानिमित्त रिझवान भाई आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक अभिनंदन! पत्रकारितेतील हा प्रवास असाच निर्भीड, निःपक्ष आणि सामाजिक बांधिलकी जपत पुढे जावो आणि त्यांच्या लेखणीतून यापुढेही अनेक सामान्यांना न्याय मिळवून देणारे कार्य घडो, हीच मनःपूर्वक शुभेच्छा!

प्रशांत सुलाखे, संपादक – लोकांक्षा

पत्रकारिता म्हणजे केवळ बातम्या देणे नव्हे, तर समाजाला दिशा दाखवणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि प्रशासनाला जनतेप्रति उत्तरदायी बनवणे होय. ऊन, वारा, पाऊस किंवा कोणतीही आणीबाणीची परिस्थिती असो, स्वतःच्या जिवाची पर्वा न करता सत्य शोधून ते लोकांसमोर आणण्याचे अथांग कार्य आपण पत्रकार करत आहात. आजच्या या डिजिटल युगातही पत्रकारितेचे मूल्य आणि महत्त्व तितकेच अबाधित आहे. सत्य, निर्भीड आणि निष्पक्ष पत्रकारितेचा ध्यास घेऊन समाजाची सेवा करणाऱ्या सर्व पत्रकार बंधू-भगिनींना, संपादकांना, बातमीदारांना आणि माध्यम क्षेत्रातील तंत्रज्ञांना मानाचा मुजरा! तुमची लेखणी अशीच तळपत राहो आणि सर्वसामान्यांचा आवाज बुलंद होत राहो, याच मनःपूर्वक सदिच्छा!



वर्धापन दिनाच्या खूप खूप शुभेच्छा!ह्न
अशोक राठोड गटविकास अधिकारी

सत्याचा आवाज जनतेपर्यंत पोहोचवणारे पत्रकार रिजवान शेख सर यांना वर्धापन दिनाच्या



हार्दिक शुभेच्छा तुमची लेखणी अशीच धारदार आणि कणखर राहो. पुढील प्रवासासाठी खूप खूप शुभेच्छा
–भाग्यश्री विलास सुतार

## सडेतोड लेखणीचा १३ वा वर्धापन दिन 'दिव्य आधार'च्या ग्राउंड रिपोर्टला सलाम

दिव्य आधारचे संपादक शेख रिजवान हे केवळ वृत्तपत्र चालवत नाहीत, तर पत्रकारितेची निर्भीड परंपरा जपत समाजातील वास्तव वाचकांसमोर मांडत आहेत. प्रत्येक अंक फोर कलरमध्ये, नियमित आणि दर्जेदार स्वरूपात प्रसिद्ध करून त्यांनी वाचकांच्या मनात विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे.



'दिव्य आधार'मधील प्रत्येक बातमी वाचनीय असते मात्र त्यांचा विशेष 'ग्राउंड रिपोर्ट' हा अनेकांच्या भुवया उंचावणारा आणि झोप उडवणारा ठरतो. मुद्द्याच्या मुळाशी जाऊन वस्तुस्थिती समोर आणण्याची त्यांची शैली, कोणाचीही भीडभाड न ठेवता प्रश्न उपस्थित करण्याची निर्भीडता आणि सामान्यांच्या आवाजाला व्यासपीठ देण्याची भूमिका ही त्यांच्या पत्रकारितेची खरी ओळख आहे.

सत्याला रंग देण्यापेक्षा सत्याचा रंग दाखविणारी ही लेखणी अशीच धारदार राहो,

'दिव्य आधार'चा वाचकवर्ग दिवसेंदिवस वाढत राहो आणि पत्रकारितेतील हा 'दिव्य आधार' समाजाला कायम मार्गदर्शक ठरो, ही १३ व्या वर्धापन दिनानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा..!

आज बातमी वाचकांपर्यंत पोहोचवणे सोपे झाले आहे पण बातमीच्या मुळापर्यंत पोहोचून सत्य बाहेर आणणे हीच खरी पत्रकारिता आहे आणि हीच 'दिव्य आधार'ची ओळख ठरत आहे.. हे नक्कीच अभिनंदनीय आहे.संपादक, शेख रिजवान साहेब व 'दिव्य आधार' परिवारास १३ व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

वैभव जगदेवी विवेक स्वामी,
संपादक, दैनिक समर्थ राजयोग, बीड

## 'दिव्य आधार' वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

'दिव्य आधार' या लोकप्रिय दैनिकाने आपल्या निर्भीड, निष्पक्ष आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या पत्रकारितेच्या माध्यमातून गेली १४ वर्षे वाचकांच्या मनात विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे. समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडत सामान्यांच्या हक्कासाठी आवाज उठविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य दैनिकाने सातत्याने केले आहे.



लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारितेची मूल्ये जपत 'दिव्य आधार' ची यशस्वी वाटचाल अशीच अखंड सुरू राहो, उत्तरोत्तर नवनवीन यशाची शिखरे गाठो आणि वाचकांचा विश्वास अधिक दृढ होवो, ही मनःपूर्वक शुभेच्छा.

दैनिक 'दिव्य आधार'च्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त संपादक, पत्रकार, प्रतिनिधी व संपूर्ण दिव्य आधार परिवारास हार्दिक शुभेच्छा!

प्रा.डॉ.अरुण राजाराम दैतकार पाटील
श्री बंकटस्वामी महाविद्यालय, बीड



सडेतोड पत्रकारिता म्हणजे दिव्य आधार दैनिक सर्वसामान्य प्रश्नाला वाचा फोडणारा एकमेव निस्वार्थी दैनिक म्हणजे दिव्य आधार एकमेव दैनिक आहे की ज्यांची बीड शहरातील लोक वाट पाहत असतात म्हणजेच दिव्य आधार आहे.
–राजु भारत महुवाले

## संपादक रिजवान भाई शेख सर्वसामान्याच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचं महान कार्य करीत आहेत

वृत्तपत्राच्या नावामध्ये आधार आहे म्हणूनच हे वृत्तपत्र सर्वसामान्यांचा दिव्य आधार बनले आहे आणि विशेष म्हणजे एका तपाहून अधिक हे वृत्तपत्र अविरतपणे जनतेच्या सेवेसाठी सज्ज आहे आणि खऱ्या अर्थाने संपादक रिजवान भाई शेख सर्वसामान्याच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचं महान कार्य करीत आहेत नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्याच काम या वृत्तपत्राच्या माध्यमातून होत आहे उपेक्षितांना न्याय आणि मूलभूत हक्क मिळवून देण्याचा दिव्य आधार चा सुरू असणारा हा उपक्रम अविरत पणे सुरू आहे दिव्य आधार या वृत्तपत्रामध्ये असणारे सदर ग्राऊंड रिपोर्ट हे वाचायला खूप आवडते मी दोन तीन वर्षापूर्वी नगरसेवक बिलाल भाई शेख यांनी आयोजित केलेल्या योगेश पर्व प्रीमियर लीग या स्पर्धेच्या समलोचनासाठी आली होतो त्यावेळी माझी आणि संपादक रिजवान भाई यांच्याशी ओळख झाली मनासारखा राजा आणि राजासारखं मन अस रिजवान भाई हे व्यक्तिमत्व आहे खूप कमी वेळा असं होतं माणूस पहिल्या भेटीत प्रेमात पडतो पण मी रिजन भाई यांच्या स्वभावाच्या आणि त्यांच्या सच्च्या पत्रकारितेच्या प्रेमात पडलो त्यावेळी पासून निरंतरपणे मी दिव्य आधार हे वृत्तपत व्हाट्सअप च्या माध्यमातून दररोज वाचत असतो दिव्य आधार चा हा प्रवास अखंडितपणे पुढे असा च सुरू रहावा याच वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा



**इरशाद रफिक बागवान**
**क्रिकेट समालोचक ,निवेदक, सूत्र संचालक,**
**सांगोला जी सोलापूर, ९०११४४३४४६**

## सामान्यांच्या प्रश्नांना व्यासपीठ दिव्य आधारने उपलब्ध करून दिले–बल्लाळ

'दिव्या आधार' साप्ताहिक मागील १३ वर्षांपासून सातत्याने आपल्या कार्यातून समाजातील सामान्य, गोरगरीब आणि वंचित घटकांच्या समस्या व प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडत आहे.



विशेषतः सामान्य रुग्णालयातील सर्वसामान्य व गोरगरीब रुग्णांना मिळणाऱ्या सेवा-सुविधा, त्यांच्या अडचणी आणि आवश्यक सुधारणा याबाबत 'दिव्य आधारने सातत्याने आपली भूमिका मांडत सामाजिक बांधिलकी जपली आहे. सामान्यांच्या प्रश्नांना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या 'दिव्य आधार' साप्ताहिकाच्या या उल्लेखनीय कार्याचे मनःपूर्वक कौतुक आणि अभिनंदन! 'दिव्य आधार'च्या पुढील यशस्वी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

**पोलीस निरीक्षक**
**शितलकुमार बल्लाळ**

मी प्रा. अशोक दहिफळे. आपल्या सा. दिव्य आधार चा नियमित वाचक आहे. आपले लिखाण नेहमी सत्य व परखड असते. आजच्या बिकाऊ मीडिया च्या दुनियादारीत सुद्धा तुम्ही सत्य मांडता. विषय कोणताही असो मुद्देसूद व परिपूर्ण असतो. अशीच प्रगती होतं रहो. अशाच कोटी कोटी शुभेच्छा!
–अशोक दहिफळे



पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील सत्य आणि सामान्य माणसाचा आवाज निर्भीडपणे मांडण्याचे आपले कार्य असेच अविरत सुरू राहो. 'दिव्य आधार'चा वाचकांचा विश्वास दिवसेंदिवस अधिक दृढ होवो आणि आगामी काळात पेपरची अशीच उत्तरोत्तर प्रगती होत राहो, ही मनःपूर्वक शुभेच्छा!

संपादक शेख रिझवान सर आणि संपूर्ण दिव्य आधार परिवारास वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
– केशव मुंडे संपादक, दिव्य लोकभूमी, बीड

## 'दिव्य आधार'च्या १४ वर्षांच्या यशस्वी वाटचालीस मानाचा मुजरा!

**दिव्य आधार या दैनिकाच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त संपादक, पत्रकार, प्रतिनिधी व संपूर्ण दिव्य आधार परिवारास मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा! गेल्या चौदा वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीत सत्य, निर्भीडता, निःपक्षपातीपणा आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना प्रभावी व्यासपीठ मिळवून देण्याचे उल्लेखनीय कार्य दिव्य आधारने केले आहे. ग्रामीण भागापासून शहरापर्यंतच्या विविध प्रश्नांना वाचा फोडत वंचित, उपेक्षित आणि सर्वसामान्यांच्या आवाजाला बळ देण्याचे काम दैनिकाने सातत्याने केले आहे. बदलत्या काळानुसार पत्रकारितेतील नवी आव्हाने स्वीकारत विश्वासार्ह, निर्भीड आणि दर्जेदार पत्रकारितेची परंपरा अधिक भक्कम करण्यासाठी दिव्य आधारची वाटचाल अशीच अविरत सुरु राहो, हीच मनःपूर्वक सदिच्छा. १४ वर्षांचा हा प्रवास म्हणजे केवळ काळाचा टप्पा नसून, वाचकांनी दिलेल्या विश्वासाची आणि पत्रकारितेवरील निष्ठेची पावती आहे. आपली लेखणी जनतेचा आवाज बनत राहो, अन्यायाविरुद्ध सदैव निर्भीडपणे लढत राहो आणि 'दिव्य आधार'ची यशोगाथा अशीच दिवसेंदिवस बहरत राहो! ह्न १४ व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा!**



**–आयेशा शेख, संपादक, लोक जगत**
**तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मराठवाडा विभागीय अध्यक्ष**

दिव्य आधार दैनिकाच्या १४व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!


गेल्या १४ वर्षांपासून निर्भीड, निष्पक्ष आणि लोकाभिमुख आणि ग्राउंड रिपोर्ट,पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे तसेच सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी आवाज उठविण्याचे कार्य दिव्य आधार दैनिकाने सातत्याने केले आहे. ग्रामीण भागातील बातम्यांना योग्य स्थान देत जनतेच्या सुख-दुःखाशी नाते जोडणारे हे दैनिक समाजाचे विश्वासू व्यासपीठ बनले आहे.



आगामी काळातही दिव्य आधार दैनिकाची वाटचाल अधिक यशस्वी, प्रभावी आणि लोकहिताची होवो, हीच मनःपूर्वक शुभेच्छा.

दिव्य आधार परिवारास वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**अन्यायाविरुद्ध वाचा फोडणारे,गोरगरीब रुग्णावर होणाऱ्या अन्यायाचा कर्दनकाळ व पिडीत आणि शोषितांना योग्य न्याय देणारं वृत्तपत्र म्हणजे सा.दिव्या आधार**



**– रुग्णसेवक शरद नवनाथ झोडगे**

## पुराव्यांच्या आधारे गैरप्रकार आणि अनियमितता जनतेच्या निदर्शनास आणून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य 'दिव्य आधार'ने केल

'दिव्य आधार' हे साप्ताहिक सुरू झाल्यापासून बीड जिल्ह्यातील महत्त्वाच्या प्रश्नांना सातत्याने हात घालत असून, विविध विषयांवर पुराव्यानिशी माहिती संकलित करून ती जनतेसमोर मांडण्याचे निर्भीड काम करत आहे.



जिल्ह्यातील प्रशासनाशी संबंधित अनेक प्रकरणांमध्ये वस्तुस्थितीचा शोध घेऊन, पुराव्यांच्या आधारे गैरप्रकार आणि अनियमितता जनतेच्या निदर्शनास आणून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य 'दिव्य आधार'ने केले आहे. लोकशाहीमध्ये माध्यमांची भूमिका केवळ बातम्या देण्यापुरती मर्यादित नसून, प्रशासनाला जाब विचारणे, जनतेचा आवाज बुलंद करणे आणि सत्य समाजासमोर आणणे हीदेखील तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे. ही जबाबदारी 'दिव्य आधार' सक्षमपणे पार पाडत आहे.

यापुढील काळातही 'दिव्य आधार'ने याच निर्भीड, निष्पक्ष आणि पुराव्यानिशी पत्रकारितेची परंपरा कायम ठेवावी आणि बीड जिल्ह्यातील जनतेच्या प्रश्नांना प्रभावी व्यासपीठ मिळवून द्यावे, ही मनःपूर्वक अपेक्षा. लवकरच 'दिव्य आधार'चे साप्ताहिकातून दैनिक वर्तमानपत्रात रूपांतर व्हावे आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात त्याचा विस्तार अधिक व्यापक व्हावा, यासाठी मनःपूर्वक सदिच्छा! दिव्य आधारच्या संपूर्ण टीमला पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

**–अजय सरवदे,** मा. जिल्हाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी बीड



दिव्य आधार या वर्तमान पत्राच्या १३ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने श्री शेख रिजवान भाई यांना खूप खूप हार्दिक शुभेच्छा तसेच आपल्या वर्तमान पत्र्यात आरोग्य विभागाच्या सकारात्मक बातम्या प्रसिद्ध केल्या त्यामुळे आरोग्य विभागाची मानकानं मध्ये चांगली वाढ झाली आहे पुन्नच एकदा हार्दिक शुभेच्छा –श्री रमेश तांगडे जिल्हा कार्यक्रम पर्यवेक्षक जिल्हा रुग्णालय बीड

दिव्य आधार प्रेसच्या १३ वर्षांच्या यशस्वी वाटचालीबद्दल मनःपूर्वक अभिनंदन! ह्न



सत्य, निर्भीड आणि लोकाभिमुख पत्रकारितेची ही वाटचाल अशीच पुढे सुरू राहो. समाजाच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडत राहून पत्रकारितेच्या क्षेत्रात नवनवीन उंची गाठावी, ही मनःपूर्वक शुभेच्छा!
– कल्याण पारखे

दिव्य आधार पेपरने गेल्या १३ वर्षांत समाजाला सत्य, निष्पक्ष आणि विश्वासार्ह पत्रकारितेचा दिव्य आधार दिला आहे. शेख रिजवान सर आपल्या अथक परिश्रमामुळे आणि निष्ठापूर्ण लेखणे मुळे हा प्रवास यशस्वी झाला आहे.



पुढील वाटचालीस अखंड यश, प्रगती आणि वाचकवर्गाचा अधिकाधिक विश्वास मिळो, हीच सदिच्छा!
शुभकामना!
दिव्य आधार पेपर चिरंजीव होवो!
अशोक सोनाजी ठाकरे

## दिव्य आधार वृत्तपत्राने पत्रकारितेची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली

दैनिक दिव्य आधार या लोकप्रिय वृत्तपत्राने आपल्या १४ वर्षांच्या वाटचालीत समाजातील विविध महत्त्वाच्या प्रश्नांना नेहमीच प्राधान्य दिले आहे. सामान्य जनतेच्या समस्या आणि भावना वृत्तपत्रातून मांडून त्यांचा आवाज समाजापर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे काम दैनिक दिव्य आधारने केले आहे. सत्य, निर्भीडपणा आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांना महत्त्व देत या वृत्तपत्राने पत्रकारितेची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली आहे. समाजातील वंचित, शोषित आणि सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आपल्या लेखणीच्या माध्यमातून आवाज उठवला आहे. या उल्लेखनीय कार्याबद्दल दैनिक दिव्य आधारचे संपादक आदरणीय रिझवान भाई यांचे मनःपूर्वक अभिनंदन!



आपल्या नेतृत्वाखाली दैनिक दिव्य आधारची वाटचाल यापुढेही अधिक प्रभावी आणि यशस्वी होत राहो. समाजातील वंचित, शोषित तसेच सामान्य जनतेच्या समस्या मांडण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपल्या लेखणीला अधिक बळ मिळो, ही मनापासून शुभेच्छा.दैनिक दिव्य आधारला भविष्यातही भरभरून यश, मोठी लोकप्रियता आणि नवनवीन उंची मिळो, अशी सदिच्छा.

दैनिक दिव्य आधारच्या १४व्या वर्धापनदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा! आपली लेखणी अशीच निर्भीड, सत्य आणि प्रभावी राहो आणि पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाची सेवा करण्याचे आपले कार्य असेच निरंतर सुरू राहो, ही मनःपूर्वक शुभेच्छा!

कादरी शाहेद, संस्थापक सचिव, क्रांतिकारी शिक्षक संघटना महाराष्ट्र

दिव्य आधार यांच्या १३ व्या वर्धापन दिनानिमित्त आणि १४ व्या वर्षात पदार्पण करत असल्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन व अनंत शुभेच्छा! समाजातील घटकांसाठी आपण करत असलेले कार्य अत्यंत कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे. पुढील प्रवासासाठी आपल्याला उदंड आणि निरोगी आयुष्य लाभो, हीच प्रार्थना.



पिनू राजे डांगे
बीड तालुका सचिव काँग्रेस)



अन्यायाविरुद्ध आवाज उठवून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडने पत्रकारिता ही केवळ बातमी देण्यासाठी नसून समाजाचा आरसा असते. हा आरसा प्रामाणिकपणे दाखवणाऱ्या दिव्य आधारला १४ व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

दिव्य आधार म्हणजे लोकांच्या आधार न्याय व भ्रष्टाचार व इन्साफ सर्वांसाठी आवाज उठवण दिव्य आधार लोकांच्या मनात घराघरात आहे दिव्य आधार म्हणजे एक ताकत आहे गोरगरीब जनतेसाठी प्रश्न दिव्य आधार मध्ये नेहमी प्रश्न उठवण्याचा काम दिव्य आधार यांनी केले आहे दिव्य आधारचे संपादक रिजवान भाई नेहमी न्याय आणि भ्रष्टाचार च्या विरोधात एकमेव बीडमध्ये दिव्य आधार मध्ये भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठवण्याचा काम करत आहे त्यांच्या पुढील वाटचालीला माझ्याकडून भीमशक्ती सामाजिक संघटना तर्फे यांना वर्धापन दिन निमित्ताने हार्दिक शुभेच्छा
डॉ शेरखान




दिव्य आधार साप्ताहिक वृत्तपत्राचा उद्या वर्धापन दिन आहे वर्धापन दिनानिमित्त माननीय ग्राउंड रिपोर्टर तडफदार नेतृत्व असलेले संपादक रिजवान भाई शेख यांची पुढील वाटचाल अशीच भरभराटीची असो बीड जिल्ह्याचे असेच कार्य त्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरळीत चालू सर्वसामान्यांना हक्काचे स्टेज दीर्घकाल मिळावे व त्यांच्या पत्रकाची जनसामान्यांमध्ये अशीच ख्याती उंचावत जावो अभिनंदन रिजवान भाई शेख



–मोतीलाल मावजी सदाना

दिव्य आधार परिवारास वर्धापन दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! निर्भीड, निष्पक्ष आणि लोकहिताची पत्रकारिता जपल्याबद्दल आपले अभिनंदन। आपल्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा!
शुभेच्छुक – बालाजी लोंढे

दिव्य आधारचे संपादक खरोखर तळमळ करून तळागाळातून माहिती गोळा करू माहितीची खात्री करूनच न्यूज पेपर मध्ये बातमी करतात अनेकांनी त्यांना वाढीव बातमी देण्यासाठी दबाव आणून किंवा इतर मार्गाने अवलंब केला परंतु त्यांनी सत्य आहे तेच छापणार अशा भाषेत समोरच्याची शांतपणे नशा उतरवली अशा वृत्तपत्राची खरोखर बीड साठी अत्यंत आवश्यकता आहे त्यांना तेराव्या वर्धापन दिनाच्या मनापासून लाख लाख शुभेच्छा



–सुरेश केशवराव सांगळे
पोलीस उपनिरीक्षक एमआयडीसी वाळुंज छत्रपती संभाजीनगर.

## साप्ताहिक दैनिक दिव्य आधार जनतेच्या आवाजाचे प्रभावी व्यासपीठ!

सत्य, निर्भीड पत्रकारिता आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम म्हणजे साप्ताहिक दैनिक दिव्य आधार समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे आणि वास्तव परिस्थिती जनतेसमोर मांडण्याचे काम हे वृत्तपत्र सातत्याने करत आहे.



संपादक शेख रिजवान भाई यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्य वार्तांने पत्रकारितेच्या क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. कोणत्याही दबावाला बळी न पडता सत्याला प्राधान्य देणारी आणि जनहिताचा आवाज बुलंद करणारी पत्रकारिता ही निश्चितच कौतुकास्पद आहे.दिव्य वार्ताच्या संपूर्ण टीमला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!आपली लेखणी अशीच निर्भीडपणे जनतेच्या प्रश्नांसाठी चालत राहो आणि समाजहितासाठी आपले कार्य अधिक व्यापक होवो. – किरण तानाजी भोसले, जिल्हा समन्वयक शिवसेना बीड जिल्हा मो.९६२३३३१९९६

साप्ताहिक दिव्य आधारचे संपादक तथा माननीय पत्रकार रिजवानजी,आपण सातत्याने करत असलेली इन्व्हेस्टिगेटिव्ह पत्रकारिता ही आजच्या काळात अपवादानेच पाहायला मिळते. सत्याचा शोध घेऊन, सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडणे आणि त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आपल्या लेखणीच्या माध्यमातून आवाज उठवणे, हे निश्चितच कौतुकास्पद व समाजहिताचे कार्य आहे.



आपली पत्रकारिता ही केवळ बातमी देण्यापुरती मर्यादित नसून जनकल्याणकारी आणि जनसामान्यांच्या न्याय-हक्कांसाठी लढणारी पत्रकारिता आहे. अन्याय, गैरप्रकार आणि व्यवस्थेतील त्रुटींवर निर्भीडपणे प्रकाश टाकण्याचे आपले कार्य समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.आपल्या लेखणीची धार अशीच कायम तीक्ष्ण राहो, सत्यासाठीचा आपला संघर्ष अधिक बळकट होवो आणि आपल्या पत्रकारितेतून अनेक सर्वसामान्यांना न्याय मिळो, हीच मनःपूर्वक शुभेच्छा. आपल्या निर्भीड आणि जनहिताच्या पत्रकारितेला मनःपूर्वक सलाम!
–डॉ अशोक गायकवाड

# विनापरवानगी गर्भाशय शस्त्रक्रिया यूटराईन ट्रान्सप्लांट केल्याचा संशय

## संबंधित खासगी हॉस्पिटलच्या डॉक्टरने गर्भपिशवी काढण्यापूर्वी जिल्हा रुग्णालयातील तज्ज्ञांची परवानगी घेतली होती का?

**नेकनूर येथील एका ४० वर्षीय महिलेला लघवी इन्फेक्शनचा त्रास झाल्याने शहरातील एका खासगी हॉस्पिटलच्या डॉक्टरकडे उपचार घेतल्यानंतर संबंधित डॉक्टरने गर्भपिशवी काढण्याचे गरज असल्याचे सांगून शस्त्रक्रिया केल्याची मिळाली माहिती**

**शहरातील एका खासगी रुग्णालयात असा प्रकार घडल्याची तक्रार दाखल**





दिव्य आधार

सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ (पान-४)


# यूटराईन ट्रान्सप्लांट करणारे रॅकेट सक्रीय असल्याचा संशय, भयंकर सत्य समोर येण्याची शक्यता




ग्राऊंड रिपोर्टर
दिव्य आधार
शेख रिजवान
9561840184


**मे २०२३ या महिन्यात संबंधित महिलेने शहरातील एका खासगी सोनोग्राफी सेंटरवर सोनोग्राफी केल्यानंतर गर्भपिशवीवर थोडीफार सूज व लघवी इन्फेक्शन झाल्याचे रिपोर्ट आले, ते रिपोर्ट संबंधित खासगी हॉस्पिटलमधील डॉक्टरांना दाखविल्यानंतर गर्भपिशवी काढावीच लागेल असा संबंधित डॉक्टरने सल्ला दिला**

**संबंधित रुग्ण महिलेने त्यावेळी गर्भपिशवीची शस्त्रक्रिया करण्यास टाळले, त्यानंतर त्या खासगी हॉस्पिटलच्या डॉक्टरने रुग्ण महिलेच्या पतीला कॉल करून पिशवी काढावीच लागेल असा हट्ट केला व हॉस्पिटलला बोलावून घेतले, संबंधित रुग्ण महिला व त्याचे पती खासगी हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतर संबंधित डॉक्टरने रक्तनमुणे तपासणीसाठी घेतले**

**बीड :**

ऊसतोड मजूर महिलांच्या गर्भाशय शस्त्रक्रियेचा मुद्दा गाजलेला असताना शहरातील एका खासगी हॉस्पिटलमध्ये नेकनूर येथील ४० वर्षीय महिलेच्या गर्भशयाची शस्त्रक्रिया विनापरवानगी केल्याची बाब समोर आली असून याप्रकरणी तब्बल तीन वर्षानंतर संबंधित महिलेच्या पतीने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सतीशकुमार साळुंके यांच्याकडे तक्रा दिल्याने एकच खळबळ उडाली असून विशेष म्हणजे त्या रुग्ण महिलेच्या पतीने विनापरवानगी गर्भपिशवीची शस्त्रक्रिया केल्याचा आरोप करत संबंधित डॉक्टरने यूटराईन ट्रान्सप्लांट केल्याचाही तक्रारीत आरोप असल्याने या प्रकरणाला गंभीर वळण मिळण्याची शक्यता दर्शवली जात आहे. विशेष म्हणजे संबंधित डॉक्टर हा स्त्रीरोग तज्ज्ञ नाही तरीही त्यांनी दुसऱ्या डॉक्टरला स्वत:च्या खासगी हॉस्पिटलमध्ये बोलावून सदरील रुग्ण महिलेच्या पिशवीची शस्त्रक्रिया केल्याची माहिती संबंधित रुग्ण महिलेच्या पतीने दिली असून जर या तक्रारी अर्जाची पारदर्शक चौकशी झाली तर भयंकर सत्य समोर येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. विशेष म्हणजे मे २०२३ या महिन्यात सदरील रुग्ण महिलेची सोनोग्राफी करण्यात आली होती. त्या सोनोग्राफी रिपोर्टमध्ये सदरील महिलेच्या पिशवीवर सूज आणि लघवी इन्फेक्शन असल्याचा रिपोर्ट आहे तर मग संबंधित खासगी हॉस्पिटलच्या डॉक्टरने थेट गर्भपिशवी काढण्याचा निर्णय का घेतला? विशेष म्हणजे सदरील खासगी हॉस्पिटलच्या डॉक्टरने रुग्ण महिलेच्या पतीला सतत कॉल करून तुमच्या पत्नीच्या गर्भशयाची शस्त्रक्रिया करावीच लागेल असा हट्ट का धरला? विशेष म्हणजे संबंधित खासगी हॉस्पिटलच्या डॉक्टरने रुग्ण महिलेवर गर्भपिशवीची शस्त्रक्रिया करण्यापूर्वी जिल्हा रुग्णालयातून परवानगी घेतली होती का? असे अनेक प्रश्न आता उपस्थित झाले असून जिल्हा रुग्णालय प्रशासन त्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने पुढे काय कारवाई करणार? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. जर गर्भाशयावर शस्त्रक्रिया करून इतर रुग्णांना यूटराईन ट्रान्सप्लांट करत असतील तर बीड शहरात हे रॅकेट सक्रीय असल्याचीही शंका व्यक्त केली जात असून जर असे झाले असेल तर आतापर्यंत ज्या गर्भाशयाच्या शस्त्रक्रिया झाल्यात त्यांच्यावरही या चौकशीची टांगती तलवार लटकणार यात काही शंका नाही.

मे २०२३ या महिन्यात नेकनूर येथील ४० वर्षीय रुग्ण महिलेचे पती फुफुसाच्या आजाराने त्रस्त असल्याने ते शहरातील एका खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असताना त्यांच्या पत्नीला लघवी इन्फेक्शन झाल्याने त्रास होत होता. त्यांनी इकडे तिकडे न जाता याच हॉस्पिटलमध्ये आपल्या पत्नीला दाखवून घेवू म्हणून त्याच खासगी रुग्णालयातील डॉक्टरला सांगून पत्नीला उपचार घेतले. त्यानंतर रुग्ण महिलेच्या पतीचा फुफुसाचा आजार काही प्रमाणात बरा झाल्याने त्यांनी त्या खासगी हॉस्पिटलमधून सुट्टी घेतली, दरम्यान लघवीचे इन्फेक्शनसोबत रुग्ण महिलेला राहून राहून रक्तस्त्राव होत असल्याने त्या महिलेच्या पतीने आपल्या पत्नीची शहरातील एका सोनोग्राफी सेंटरवर गर्भाशयाची सोनोग्राफी करून घेतली व तो रिपोर्ट एका स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टरला दाखविल्यानंतर संबंधित स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टरने जर पिशवीची शस्त्रक्रिया करायची असेल तर जिल्हा रुग्णालयाची परवानगी घ्यावी लागेल असे म्हणून शस्त्रक्रिया करण्यास नकार दिला. त्यानंतर संबंधित रुग्ण महिलेला घेवून तिचे पती पुन्हा पूर्वीच्याच खासगी हॉस्पिटलमध्ये गेले. तेथील डॉक्टरने तो सोनोग्राफी रिपोर्ट पाहून तुमच्या गर्भशयाची शस्त्रक्रिया करावी लागेल असे गंभीरपणे सांगून भविष्यात हा त्रास वाढत जाणार असे सांगितले. रुग्ण महिला व तिच्या पतीने त्यावेळी गर्भशयावर शस्त्रक्रिया करण्याचे टाळले व घरी निघून आले. त्यानंतर त्या खासगी डॉक्टरने सतत त्या रुग्ण महिलेच्या पतीला संपर्क करून पिशवीवर शस्त्रक्रिया करून घ्या नसता भविष्यात मोठा आजार होवू शकतो असे सांगून सतत पाठपुरावा केला व एका दिवशी हॉस्पिटलला बोलावून घेतले व रुग्ण महिलेचे रक्ततपासणीसाठी रक्तनमुणे घेतले नंतर रुग्ण महिला व तिचे पती परत घरी आले. काही दिवसाने संबंधित डॉक्टरने पुन्हा रुग्ण महिलेच्या पतीला कॉल करून तुम्ही पिशवीची शस्त्रक्रिया करून घ्या असे म्हणून ऑक्टोबर २०२३ या महिन्यात पुन्हा हॉस्पिटलला बोलावून घेवून त्यांना समजावून सांगितले. विशेष म्हणजे गर्भाशयाची शस्त्रक्रिया करण्यासाठी त्या काळात ७० ते ८० हजार रुपये खर्च येत होता तरीही त्या खासगी हॉस्पिटलच्या डॉक्टरने रुग्ण महिलेच्या पतीला विश्वासात घेवून मी तुमच्या पत्नीच्या गर्भाशयाची शस्त्रक्रिया फक्त ३० हजार रुपयात करतो, त्यात औषधगोळ्यांचा खर्चही करतो. त्याशिवाय जिल्हा रुग्णालयातून परवानगीही घेतो, त्यानंतर रुग्ण महिलेच्या पतीने शस्त्रक्रियेसाठी परवानगी दिली. ऑक्टोबर २०२३ या महिन्यात सदरील महिलेच्या गर्भाशयाची शस्त्रक्रिया झाली, काही दिवस त्यांना आराम मिळाला परंतु पुन्हा पूर्वीच्या आजाराचा त्रास सुरू झाला. दरम्यान रुग्ण महिलेच्या पतीने त्या खासगी हॉस्पिटलच्या डॉक्टरला वारंवार कॉल करून शस्त्रक्रिया झाल्यानंतरही त्रास कमी होत नाही असे सांगितले. सुरुवातीला त्या डॉक्टरने मदत करण्याची भूमिका ठेवली, त्यानंतर मात्र तो डॉक्टर हमरीतुमरी करू लागला. विशेष म्हणजे या मुद्यावर अनेकवेळा रुग्ण महिलेच्या पतीसोबत त्या डॉक्टरची बोलाबोलीही झाली. शहरातील काही प्रतिष्ठीतांनी मध्यस्थी करून हे प्रकरण मिटविण्याचे प्रयत्नही केल्याची चर्चा असून शेवटी त्या रुग्ण महिलेच्या पतीने या गंभीर प्रश्नाकडे विशेष लक्ष देवून जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडे तक्रार दिली असून चौकशीअंती सर्व सत्य बाहेर येणारच यात काही शंका नाही.

## मे महिन्याच्या सोनोग्राफी रिपोर्टवरच ऑक्टोबर महिन्यात शस्त्रक्रिया

सदरील रुग्ण महिलेला मे २०२३ या महिन्यात लघवी इन्फेक्शनचा त्रास झाला होता व त्यानंतर थोडाफार राहून राहून रक्तस्त्रावही होत होता. त्यामुळे रुग्ण महिलेच्या पतीने बीडच्या एका खासगी सोनोग्राफी सेंटरवर त्यावेळी सोनोग्राफी करून रिपोर्ट घेतला होता. त्या रिपोर्टमध्ये रुग्ण महिलेच्या गर्भाशयावर थोडीफार सूज व लघवी इन्फेक्शन झाल्याचे रिपोर्टमधून दिसून आले. एखाद्या स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टरांनी तो रिपोर्ट पाहिला असता तर सर्वप्रथम औषध-गोळ्या देवून तिच्या गर्भाशयावरील सूज कमी केली असती व लघवी इन्फेक्शनवरही उपचार झाले असते. परंतु त्या खासगी हॉस्पिटलच्या डॉक्टरने स्वत: स्त्रीरोग तज्ज्ञ नसताना मे महिन्यात केलेल्या सोनोग्राफी रिपोर्ट पाहून पिशवीची शस्त्रक्रिया करावी लागेल असा सल्ला दिला. त्यानंतर मे महिन्यात काढलेल्या सोनोग्राफी रिपोर्टच्या आधारावर ऑक्टोबर महिन्यात शस्त्रक्रिया केली. दरम्यान त्या खासगी हॉस्पिटलच्या डॉक्टरने रुग्ण महिलेची रक्ततपासणी केली. नियमाने बरोबर असेल परंतु पाच महिन्यांपूर्वी काढलेल्या सोनोग्राफी रिपोर्टच्या आधारावर ऑक्टोबर २०२३ या महिन्यात गर्भाशयाची शस्त्रक्रिया करणे कितपत योग्य आहे. या सर्व बाबींची उच्चस्तरीय चौकशी होणे गरजेचे वाटते.

## विनापरवानगी गर्भाशयाची शस्त्रक्रिया व यूटराईन ट्रान्सप्लांट केल्याचा आरोप

संबंधित डॉक्टरने स्वत:च्या खासगी रुग्णालयात गर्भशयावर शस्त्रक्रिया करण्यासाठी बाहेरून कोणते स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टर बोलावले होते? नियमाने गर्भशयाची शस्त्रक्रिया करण्यापूर्वी जिल्हा रुग्णालयातून परवानगी घेणे बंधनकारक आहे, ती परवानगी संबंधित हॉस्पिटलच्या डॉक्टरने घेतली होती का? किंवा रुग्णांना तुम्ही जिल्हा रुग्णालयातून परवानगी आणा तरच गर्भाशय काढता येईल असे रुग्णांना सांगितले का? रुग्णाने पिशवी काढावी म्हणून रुग्ण महिलेच्या पतीकडे संबंधित खासगी हॉस्पिटलच्या डॉक्टरने मोबाईलवरून वारंवार संपर्क करून पिशवी काढण्यासाठी हट्ट का धरला? या सर्व बाबी संशयास्पद असून विनापरवानगी गर्भाशयाची शस्त्रक्रिया करून यूटराईन ट्रान्सप्लांट करण्याचे हे षडयंत्र होते का? या दृष्टीकोनातूनही जिल्हा रुग्णालय प्रशासनाने चौकशी करण्याची गरज असून जर यात सत्य असेल तर मोठी खळबळ होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

**दरम्यान सदरील महिलेला थोडाफार रक्तस्त्राव होत होता, त्याचवेळी संबंधित डॉक्टरने घेतलेल्या रक्त नमुण्याचा अहवाल आल्यानंतर त्या डॉक्टरने रुग्ण महिलेच्या पतीला सारखे फोन करून पिशवी काढावीच लागेल, नाहीतर भविष्यात मोठी अडचण निर्माण होईल असे सांगून ऑक्टोबर २०२३ या महिन्यात हॉस्पिटलला बोलावून घेवून गर्भाशयाची शस्त्रक्रिया केली**

---

**गर्भाशयाची शस्त्रक्रिया करण्यासाठी त्यावेळी इतर खासगी हॉस्पिटलमध्ये जिल्हा रुग्णालयाची परवानगी असेल तर ७० ते ८० हजार रुपये खर्च येत होता, परंतु त्या खासगी हॉस्पिटलमधील डॉक्टरने रुग्ण महिलेच्या पतीकडून गर्भपिशवीची शस्त्रक्रिया करण्यासाठी औषध गोळ्यांच्या खर्चासहीत फक्त ३० हजार रुपये घेतले व जिल्हा रुग्णालयातून परवानगी घेतो असे सांगून शस्त्रक्रिया केली**


---

**संबंधित खासगी हॉस्पिटलच्या डॉक्टरने गर्भशयाची शस्त्रक्रिया करण्यापूर्वी मे २०२३ ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीत जिल्हा रुग्णालयाची गर्भपिशवी काढण्यासाठी परवानगी घेतली होती का? गर्भशयाची शस्त्रक्रिया करा, पिशवी काढून टाका यासाठी संबंधित डॉक्टरने त्या रुग्ण महिलेच्या पतीला पिशवी काढण्यासाठी वारंवार कॉल का केले? ७० ते ८० हजार रुपये खासगी हॉस्पिटलमध्ये खर्च येत असताना फक्त ३० हजार रुपयांमध्ये औषध गोळ्यांसहीत गर्भशयाची शस्त्रक्रिया कशी केली? विनापरवानगी सतत पाठपुरावा करून गर्भशयाची शस्त्रक्रिया करून दुसऱ्या रुग्णाला यूटराईन ट्रान्सप्लांट केले का? या सर्व बाबींची उच्चस्तरीय चौकशी होणे गरजेचे**





उद्योजक तथा ज्येष्ठ समाजसेवक शेख इलियास अहमद साहेब बिल्डर यांच्या आसेफ नगर येथील निवासस्थानी दिव्य आधारच्या तेराव्या वर्धापन दिनानिमित्त संपादक शेख रिजवान यांचा भव्य दिव्य सत्कार करण्यात आला त्यावेळी शेख इलियास साहेब बिल्डर, त्यांचे वडील शेख मोहम्मद साहब रिटायर पेशकार, नगरपरिषदचे गटनेते सय्यद फारुख अली पटेल साहेब, माजी सभापती शकील खान साहेब,ज्येष्ठ समाजसेवक मोहब्बत खान साहेब, आय काँग्रेसचे फरीदोद्दीन देशमुख साहेब, एडवोकेट इस्माईल साहेब, सामाजिक कार्यकर्ते फिरोज खान भाई, युसुफ भाई टेलर, रफिक मामू, सय्यद अफसर शेरू भाई, सय्यद जुनेद भाई, शेख आबेद भाई,



दिव्य आधार परिवारचे सदस्य खुर्शीदभाई बागवान यांच्या निवासस्थानी दिव्य आधारच्या वर्धापन दिनानिमित्त संपादक शेख रिजवान यांचा सत्कार करताना खुर्शीदभाई बागवान, जावेदभाऊ बागवान, इरफान बागवान व फरहान बागवान आदी.






हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शेख रिजवान खलील यांनी माऊली ऑफसेट माळीवेस, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे छापून साप्ताहिक दिव्य आधार कार्यालय बशीरगंज, जयहिंद प्लाझा, नगरपालिकेजवळ, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे प्रकाशित केले आहे. मो. ९५६१८४०१८४ या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही, वाद-विवाद बीड न्यायालय अंतर्गत.